**ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी हागणदारी मुक्तीची अट शिथिल करण्याबाबत...**

# महाराष्ट्र शासन
## पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
### शासन निर्णय क्रमांकः ग्रापाधो १११३/ प्र. क्र.१३०/पापु-०७

७ वा मजला, गोकुळदास तेजपाल रूग्णालय प्रशासकीय इमारत,
मंत्रालय, मुंबई .
दिनांक: १५ जुलै, २०१३

**वाचा**

१) **शासन निर्णय क्रमांकः** ग्रापायो ११०९/प्र.क्र.१०४(अ)/ पापु ०७ .दि.१७/३/२०१०
२) **शासन निर्णय क्रमांकः** ग्रापाधो १११२/ प्र. क्र.१५४/पापु-०७, दि.१४/९/२०१२
३) **शासन परिपत्रक क्रमांकः** ग्रापाधो १११२/ प्र. क्र.१६०/पापु-०७,दि. ४/१०/ २०१२
४) **शासन परिपत्रक क्रमांकः** ग्रापाधो १११२/ प्र. क्र.१६०/पापु-०७,दि. १५/०१/ २०१३
५) **शासन निर्णय क्रमांकः** ग्रापाधो १११३/प्र.क्र.१०३/ पापु ०७ .दि.०६/०६/२०१३

**प्रस्तावना**

संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये नवीन पाणी पुरवठा योजनेचा प्रस्ताव तयार करताना संबंधित गाव ६० टक्के हागणदारी मुक्त असणे व योजनेकरीता अनुदानाचा दुसरा हप्ता मिळण्यापुर्वी गाव १०० टक्के हागणदारी मुक्त असणे आवश्यक आहे, अशा सुचना देण्यात आल्या आहेत. ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनांची अमंलबजावणी वेगाने करता यावी यासाठी गावांमधील ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनांसाठी निधीच्या तीन्ही हप्त्यांच्या अदायगीसाठी गाव/वाडी हागणदारी मुक्त असण्याची अट काही कालावधीसाठी शिथिल करण्यात आली होती. राज्यात निर्माण झालेली टंचाईसदृश्य परिस्थिती विचारात घेता संदर्भ क्र.५ च्या शासन निर्णयान्वये राज्यामधील ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी विहित केलेली हागणदारी मुक्तीची अट दि.३० जून,२०१३ पर्यंत शिथील करण्यात आली होती. सदर हागणदारी मुक्तीची अट आता दि.३१ जुलै, २०१३ पर्यंत शिथिल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय

संदर्भाधीन क्र. १ येथील शासन निर्णयामध्ये विहीत करण्यात आलेली ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचा प्रस्ताव तयार करतांना संबंधित गाव ६० टक्के हागणदारी मुक्त असण्याची अट तसेच प्रगतीपथावरील योजनांना शासन हिश्श्याचा दुसरा हप्ता वितरीत करण्यासाठी विहित करण्यात आलेली १०० टक्के हागणदारी मुक्तीची अट दि.३१ जुलै,२०१३ पर्यंत शिथिल करण्यात येत आहे.

त्यानंतर प्रचलित धोरणानुसार ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी हागणदारी मुक्तीची अट व अनुदान वितरणाची पध्दत कायम राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१३०७१५१२३८४१८०२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

A SHAILA

Digitally signed by A SHAILA
DN: CN = A SHAILA, C = IN, S = Maharashtra, O = Govt Of Maharashtra, OU = WSSD
Date: 2013.07.15 13:17:07 +05'30'

( शैला ए. )
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा.राज्यमंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. सर्व विधी मंडळ सदस्य
४. प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
५. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
६. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
७. विभागीय आयुक्त (सर्व)
८. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
९. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१०.संचालक, समाज कल्याण संचालनालय, पुणे,
११.संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था (WSSO) बेलापूर, नवी मंबई
१२.महालेखापाल, महाराष्ट्र -१ मुंबई (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
१३.महालेखापाल, महाराष्ट्र -२ नागपूर (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
१४.मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा,नवी मुंबई
१५.उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा,नाशिक, पुणे,औरंगाबाद, अमरावती व नागपूर
१६.अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई
१७.सर्व प्रादेशिक उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
१८. सर्व प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
१९. सर्व अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ

२०. सर्व जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
२१. सर्व कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
२२. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
२३. सर्व कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद
२४. सर्व जिल्हा समाज कल्याण अधिकारी
२५. सर्व विशेष समाज कल्याण अधिकारी
२६. सर्व जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालये,
२७. सर्व गट विकास अधिकारी, पंचायत समिती
२८. नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
२९. वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
३०. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,मंत्रालय, मुंबई
३१. मंत्रालयातील इतर सर्व विभाग,
३२. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने
३३. निवडनस्ती, कार्यासन क्रमांक पापु-०७